Epaper

डिजिटल क्रांतीची धगधगती मशाल

MSME - MH-33 -0714843

दैनिक जन सम्राट टाईम्स

सत्याचे प्राईम्स

मुख्य संपादक: मुकुंदराव शामराव नंन्नवरे

। बुधवार, दि. २४ जून २०२६ । वर्ष १ । अंक ७७ । पाने २। Title Code - T/MH/2026/0422/5204/1306 DIGITAL EDITION


भुसावळ तालुक्यात रेशन धान्य वितरणाचा बोजवारा!



(पान २ वर)

Selected

### वन्य प्राणी हल्ल्यात मृत्यूमुखी पडलेल्यांच्या वारसांना नोकरी; वनमंत्री

**मुंबई | प्रतिनिधी :** राज्यात वन्य प्राण्याच्या हल्ल्यात मृत्यूमुखी पडलेल्या नागरिकांच्या नातेवाईकांना कायमस्वरुपी नोकरी देण्याबाबतचा प्रस्ताव तयार आहे. मंत्रिमंडळ बैठकीतील मंजुरीसाठी ठेवण्यात येईल. मंत्रिमंडळाची मंजुरी मिळताच अंमलबजावणी केली जाईल, अशी घोषणा वनमंत्री गणेश नाईक यांनी विधानसभेत केली. वाघ, बिबट्या सारख्या प्राण्यांना सहज खाद्य मिळण्यासाठी कुक्कुट पालनाच्या धर्तीवर ससे पालन, हरीण पालन केले जाईल, असेही त्यांनी सांगितले. सुधीर मुनगंटीवार अन्य सदस्यांनी उपस्थित केलेल्या लक्षवेधी सूचनेद्वारे वन्य प्राण्यांच्या हल्ल्याचा प्रश्न उपस्थितीत केला होता. जयंत पाटील, आदित्य ठाकरे, प्रविण दटके आदींनी चर्चेत सहभाग घेतला. चंद्रपूर जिल्ह्यातील चार महिला वाघाच्या हल्लात मृत्यूमुखी पडल्याच्या घटनेकडे भातखळकर यांनी लक्ष वेधले.

## केतनची होणारी पत्नी सिया गोयलच निघाली मास्टरमाईंड

# केतनचा अपघात नसुन घातच!

## प्रियकराच्या मदतीने रचलेला केतन अग्रवालच्या हत्येचा कट

**जन सम्राट टाईम्स**

**पुणे : केतन आणि सियाचा फेब्रुवारी महिन्यात थाटामाटात साखरपुडा झाला होता. राजस्थानमधील राजवाड्यांमध्ये 'डेस्टिनेशन वेडिंग'ची जोरदार तयारी सुरू होती; अगदी पाहुण्यांसाठी खास विमानांचे बुकिंगही झाले होते... मात्र, जिच्यासोबत केतन नव्या आयुष्याची स्वप्ने पाहत होता, त्याच होणाऱ्या पत्नीने आपल्या प्रियकराच्या मदतीने केतनचा लोहगड किल्ल्यावरून ढकलून खून केल्याची धक्कादायक माहिती पोलिसांनी उघड केली.**

याप्रकरणी पुणे ग्रामीण पोलिसांनी केतनची होणारी पत्नी सिया प्रवीण गोयल (वय २०) आणि तिचा प्रियकर चेतन बाबूलाल चौधरी (वय २२) यांना बेड्या ठोकल्या आहेत. सिया ही कॉमर्सची, तर चेतन हा बीबीएचा विद्यार्थी आहे. केतन अग्रवाल (वय २६) याच्या मृत्यू प्रकरणाला आता एक अत्यंत धक्कादायक वळण मिळाले आहे. १८ जून रोजी घडलेली ही घटना सुरुवातीला एक दुर्दैवी अपघात असल्यासारखी भासली होती. लोहगडावरून पाय घसरून केतन खाली कोसळल्याचा बनाव रचण्यात आला होता. केतन दरीत कोसळल्यानंतर सियाने आरडाओरडा करून सुरक्षारक्षकांना बोलावले आणि केतनच्या




कुटुंबीयांना फोन करून घटनेची माहिती दिली. या माहितीच्या आधारे पोलिसांनी तांत्रिक तपास आणि सीसीटीव्ही (CCTV) फुटेजची कसून तपासणी सुरू केली. तेव्हा एका सीसीटीव्हीमध्ये सिया आणि केतन गडावर चढत असताना, त्यांच्या पाठीमागून एका व्यक्तीने डोक्यावर 'हुडी' (डोके, मान आणि चेहरा झाकणारा विशिष्ट प्रकारचा स्वेटशर्ट किंवा जाकीट) घालून, स्वतःचा चेहरा लपवत गडावर प्रवेश केल्याचे दिसले.तपासादरम्यान समोर आले की, चेहरा लपवून जाणारा दुसरा कोणी नसून सियाचा प्रियकर चेतन चौधरी होता. पोलिसांची नजर चुकवण्यासाठी चेतनने आपला स्वतःचा मोबाईल घरीच ठेवून दिला होता, जेणेकरून त्याचे लोकेशन लोहगड परिसरात दिसणार नाही. त्याऐवजी त्याने त्याच्या एका कर्मचाऱ्याचा मोबाईल सोबत आणला होता आणि तो त्याद्वारे सियासोबत व्हॉट्सॲपवर संपर्कात होता. हा संपूर्ण कट पोलिसांची दिशाभूल करण्यासाठी अत्यंत पद्धतशीरपणे रचण्यात आला होता. मात्र, पोलिसांनी तांत्रिक पुरावे आणि गुप्त माहितीच्या आधारे दोघांना ताब्यात घेतले. पोलिसी खाक्या दाखवताच दोघांनी गुन्ह्याची कबुली दिली.

# टहाकळी येथील तरुणाची आत्महत्या

## धरणगाव, शेरी परिसरात खळबळ

**जन सम्राट टाईम्स**



**धरणगाव | प्रतिनिधी: :** पाळधी परिसरातील टहाकळी येथील मूळ रहिवासी आणि सध्या शेरी येथे वास्तव्यास असलेल्या एका तरुणाने शेतात गळफास घेऊन आत्महत्या केल्याची धक्कादायक घटना उघडकीस आली आहे. या घटनेमुळे शेरी व परिसरात हळहळ व्यक्त होत आहे. मिळालेल्या माहितीनुसार, दीपक लोटन कोळी (वय ४३, रा. टहाकळी, ता. धरणगाव, ह.मु. शेरी) यांनी गोविंदा व्यंकट पाटील यांच्या शेतात गळफास घेऊन आत्महत्या केली. आज सकाळी शेरी येथील मोहन रमेश पवार हे शेतात पडसाची पाने आणण्यासाठी गेले असता त्यांना दीपक कोळी यांनी गळफास घेतल्याचे निदर्शनास आले. त्यांनी तत्काळ याबाबत ग्रामस्थ व पोलिसांना माहिती दिली. मयत दीपक कोळी हे मूळचे टहाकळी गावचे रहिवासी असून गेल्या सहा वर्षांपासून पत्नी, तीन मुली आणि एका मुलासह शेरी येथे वास्तव्यास होते. त्यांनी आत्महत्येसारखे टोकाचे पाऊल का उचलले, याचे कारण अद्याप समजू शकलेले नाही. या प्रकरणी धरणगाव पोलिसांत अकस्मात मृत्यूची नोंद करण्याची प्रक्रिया सुरू असून पुढील तपास पोलीस करीत आहेत. मृत्यूचे नेमके कारण तपासानंतर स्पष्ट होणार आहे.

जन सम्राट टाईम्स ब्रेक न्यूज

# डाक विभागाकडून अखेर विमा दाव्याला मंजुरी

## महिलेला मिळाले दोन लाखांचे विमा संरक्षण

**जन सम्राट टाईम्स**

**भुसावळ | प्रतिनिधी:** प्रधानमंत्री सामाजिक विमा योजनेअंतर्गत काढलेल्या अपघाती विमा पॉलिसीची रक्कम मिळवण्यासाठी तब्बल संघर्ष करावा लागलेल्या भुसावळ येथील एका कुटुंबाला अखेर न्याय मिळाला आहे. डाक विभागाने पूर्वी नाकारलेला विमा दावा मंजूर करत मृत व्यक्तीच्या पत्नीच्या खात्यात दोन लाख रुपयांची विमा रक्कम जमा केली आहे. भुसावळ शहरातील रहिवासी वसंत चावदस मोरे यांनी उपडाक विभागामार्फत प्रधानमंत्री सामाजिक विमा योजनेअंतर्गत बचत खात्यावर दोन लाख रुपयांच्या अपघाती विमा संरक्षणाची पॉलिसी घेतली होती. मात्र, ११ मे २०२४ रोजी गडकरी नगर परिसरात पाण्याच्या टाकीचे बांधकाम करत असताना ते खाली पडल्याने त्यांचा दुर्दैवी मृत्यू झाला. दावा फेटाळल्यानंतर ग्राहक आयोगात धाव पतीच्या निधनानंतर पत्नी सुलभा वसंत मोरे यांनी आवश्यक कागदपत्रांसह विमा रकमेसाठी डाक विभागाकडे दावा दाखल केला. मात्र, व्हिसेरा अहवाल (VISCERA REPORT) सादर न केल्याचे कारण देत मुख्य डाक अधिकारी, नवी




दिल्ली यांनी दावा नामंजूर केला.

### खात्यात जमा झाले दोन लाख रुपये

यानंतर सुलभा मोरे यांनी जिल्हा ग्राहक तक्रार निवारण आयोग, जळगाव येथे तक्रार दाखल केली. प्रकरण ग्राहक आयोगासमोर गेल्यानंतर डाक विभागाने फेरविचार करत स्वतः पोलीस प्रशासनाशी पत्रव्यवहार करून आवश्यक व्हिसेरा अहवाल प्राप्त केला. आवश्यक प्रक्रिया पूर्ण झाल्यानंतर डाक विभागाने सुलभा मोरे यांच्या खात्यात दोन लाख रुपयांची विमा रक्कम जमा केली. त्यामुळे दीर्घकाळ प्रलंबित असलेल्या या प्रकरणाला अखेर सकारात्मक पूर्णविराम मिळाला. या प्रकरणात सुलभा मोरे यांच्या वतीने ॲड. राजेश एस. उपाध्याय आणि ॲड. वैशाली सोनवणे यांनी कामकाज पाहिले.

# दिव्यशक्ती महिला प्रभागसंघाची वार्षिक सभा उत्साहात; तीन ग्रामसंघांना २८ लाखांचा निधी

## उत्कृष्ट कार्य करणाऱ्या महिला, बचत गट आणि ग्रामसंघांचा गौरव; साडेचार कोटींच्या आर्थिक व्यवहाराला सर्वानुमते मंजुरी

**जन सम्राट टाईम्स**

**शहादा | प्रतिनिधी: :** महाराष्ट्र राज्य ग्रामीण जीवनोन्नती अभियान (उमेद) अंतर्गत पंचायत समिती शहादा येथील जिल्हा परिषद गट लोणखेडा अंतर्गत कार्यरत असलेल्या 'दिव्यशक्ती महिला प्रभागसंघा'ची वार्षिक सर्वसाधारण सभा मंगळवारी (दि. २३ जून) एस. कुमार लॉन्स येथे मोठ्या उत्साहात आणि हजारो महिलांच्या उपस्थितीत पार पडली. या सभेत तीन ग्रामसंघांना तब्बल २८ लाख रुपयांचा निधी वितरित करण्यात आला. तसेच विविध क्षेत्रांत उल्लेखनीय कार्य करणाऱ्या महिला, स्वयं सहाय्यता बचत गट आणि ग्रामसंघांचा विशेष सन्मान करण्यात आला. कार्यक्रमाची सुरुवात क्रांतीज्योती सावित्रीबाई फुले, पुण्यश्लोक अहिल्याबाई होळकर आणि राजमाता जिजाऊ यांच्या प्रतिमांचे पूजन व दीपप्रज्वलनाने झाली. त्यानंतर "इतनी शक्ती हमें देना दाता..." या प्रार्थनेने सभेच्या मुख्य कार्यक्रमाला प्रारंभ झाला. प्रभाग समन्वयक सुचिता सूर्यवंशी यांनी प्रास्ताविक




केले, तर अध्यक्षस्थान दिव्यशक्ती प्रभागसंघाच्या अध्यक्षा गंगा वसावे यांनी भूषविले. प्रभागसंघाच्या लेखापाल ललिता सोनवणे यांनी सन २०२५-२६ या आर्थिक वर्षाचा लेखापरीक्षण अहवाल सादर केला. यामध्ये साडेचार कोटी रुपयांच्या आर्थिक व्यवहाराचा तपशील मांडण्यात आला. उपस्थित सदस्यांनी हा अहवाल सर्वानुमते मंजूर केला. बचत गटांच्या माध्यमातून आर्थिक स्वावलंबन मिळवत 'लखपती दीदी' बनलेल्या महिलांनी आपले अनुभव कथन करत इतर महिलांना उद्योग-व्यवसाय सुरू करण्याचे आवाहन केले. सभेदरम्यान उत्कृष्ट कार्य करणाऱ्या सीआरपी, नियमित कर्जफेड करणारे महिला स्वयं सहाय्यता गट, सामाजिक समावेशन व उद्योग क्षेत्रात उल्लेखनीय कामगिरी करणारे ग्रामसंघ आणि उत्पादक गट यांचा प्रमाणपत्र देऊन गौरव करण्यात आला. उमेदचे तालुका व्यवस्थापक ईश्वर जगदाळे यांनी बचत गटांच्या माध्यमातून महिलांचे आर्थिक सक्षमीकरण कसे घडते याविषयी मार्गदर्शन केले. तर कुणाल कानडे यांनी उद्योग-व्यवसायाच्या संधी व व्यवस्थापनाबाबत सविस्तर माहिती दिली. या कार्यक्रमाला मलोनी, वडछील, सावखेडा, कमरावद, डोंगरगाव, शोभानगर, उजलोद, लोणखेडा आणि पुरुषोत्तमनगर येथील महिला बचत गटांच्या हजारो महिला उपस्थित होत्या. तसेच किशोर बिरारे, दिलीप बैसाने, योगेश पाटील, हर्षल पाटील, विद्या वसावे, योगेश कोळी, विलास पवार, निखिल शिर्के, पुरुषोत्तम बागुल यांच्यासह अनेक अधिकारी व मान्यवर उपस्थित होते. कार्यक्रमाचे सूत्रसंचालन राजेश देवकर यांनी केले, तर आभार प्रदर्शन सुचिता सूर्यवंशी यांनी केले.

# मोहरमपूर्वी वाकी नदी परिसर स्वच्छ करा; रहिवासी व मोहरम कमिटीची नगर परिषदेला मागणी

**जन सम्राट टाईम्स**

**नशिराबाद | प्रतिनिधी :** आगामी मोहरम सणाच्या पार्श्वभूमीवर मणियार मोहल्ला परिसरातील वाकी नदी किनाऱ्याची तातडीने स्वच्छता करण्यात यावी, अशी मागणी स्थानिक रहिवासी आणि मोहरम कमिटीच्या वतीने नशिराबाद नगर परिषद प्रशासनाकडे करण्यात आली आहे. यासंदर्भात मुख्याधिकाऱ्यांना लेखी निवेदन देण्यात आले असून नगर परिषदेच्या टपाल संकलन केंद्राने ते अधिकृतपणे स्वीकारल्याची माहिती समोर आली आहे. कचरा आणि अस्वच्छतेमुळे नागरिक त्रस्त



मणियार मोहल्ला परिसरातील वाकी नदी पात्रात मोठ्या प्रमाणात प्लास्टिक, दुर्गंधीयुक्त कचरा आणि घाणीचे ढीग साचले आहेत. त्यामुळे संपूर्ण परिसराला कचरा कुंडीचे स्वरूप प्राप्त झाले असून स्थानिक नागरिकांसह भाविकांमध्ये नाराजी व्यक्त केली जात आहे. आगामी २६ जून रोजी मोहरम सण साजरा होणार असल्याने धार्मिक कार्यक्रमांवरही या अस्वच्छतेचा परिणाम होण्याची शक्यता व्यक्त होत आहे. २५ जूनपर्यंत स्वच्छतेची मागणी निवेदनात प्रशासनाला २५ जून २०२६ पर्यंत संपूर्ण परिसराची स्वच्छता करून कचरा हटविण्याची मागणी करण्यात आली आहे. सणापूर्वी परिसर स्वच्छ व सुरक्षित ठेवणे ही नगर परिषदेची जबाबदारी असल्याचे नागरिकांनी नमूद केले आहे. निर्धारित मुदतीत स्वच्छता न झाल्यास मणियार मोहल्ल्यातील रहिवासी आणि मोहरम कमिटीच्या वतीने नगर परिषद प्रशासनाविरोधात लोकशाही मार्गाने तीव्र आंदोलन छेडण्यात येईल, असा इशारा देण्यात आला आहे. या आंदोलनातून उद्भवणाऱ्या कोणत्याही परिस्थितीस नगर परिषद प्रशासन जबाबदार राहील, असेही निवेदनात स्पष्ट करण्यात आले आहे. स्थानिक नागरिकांनी प्रशासनाने तात्काळ दखल घेऊन स्वच्छता मोहीम राबवावी, अशी अपेक्षा व्यक्त केली आहे.

# साक्री तालुक्यात वीज कोसळून ४० मेंढ्यांचा मृत्यू

## खुडाणे डोंगराळ भागातील घटना



**जन सम्राट टाईम्स**

**साक्री (धुळे) | प्रतिनिधी :** धुळे जिल्ह्यातील साक्री तालुक्यातील खुडाणे गाव परिसरात निसर्गाने भीषण तडाखा दिला असून वीज कोसळल्याने तब्बल ४० मेंढ्यांचा मृत्यू झाल्याची दुर्दैवी घटना घडली आहे. या घटनेमुळे पशुपालकाचे मोठे आर्थिक नुकसान झाले असून संपूर्ण परिसरात हळहळ व्यक्त केली जात आहे. मिळालेल्या माहितीनुसार, खुडाणे गावाजवळील डोंगराळ भागात मेंढपाळ ज्ञानेश्वर तिरताप हे नेहमीप्रमाणे मेंढ्यांचा कळप चारत होते.

दरम्यान, अचानक पावसासह वादळी वारे आणि विजांचा कडकडाट सुरू झाला. याचवेळी कळपाजवळ वीज कोसळल्याने ४० मेंढ्यांचा जागीच मृत्यू झाला. मृत झालेल्या मेंढ्या या जैताणे येथील धनराज जीपा तिरताप यांच्या मालकीच्या असल्याचे समोर आले आहे.

एका क्षणात कळपातील ४० मेंढ्या दगावल्याने पशुपालकावर मोठे आर्थिक संकट ओढवले आहे. मेंढपाळालाही बसला विजेचा झटका या घटनेदरम्यान मेंढपाळ ज्ञानेश्वर तिरताप यांनाही विजेचा सौम्य झटका बसला. खबरदारीचा उपाय म्हणून त्यांना तातडीने उपचारासाठी दवाखान्यात दाखल करण्यात आले असून त्यांची प्रकृती स्थिर असल्याची माहिती मिळाली आहे. पंचनामा व मदत प्रक्रियेला सुरुवात घटनेची माहिती मिळताच खुडाणे गावचे पोलीस पाटील अनिल जाधव यांनी घटनास्थळी धाव घेत पाहणी केली. संबंधित महसूल व पशुसंवर्धन विभागाला माहिती देण्यात आली असून पंचनामा आणि नुकसानभरपाई प्रक्रियेची कार्यवाही सुरू करण्यात आली आहे. निसर्गाच्या एका तडाख्यात ४० मुक्या जीवांचा मृत्यू झाल्याने परिसरात शोककळा पसरली असून शासनाने पशुपालकाला तातडीने आर्थिक मदत द्यावी, अशी मागणी स्थानिक नागरिकांकडून करण्यात येत आहे.

### पशुपालकावर मोठे आर्थिक संकट

खुडाणे गावाजवळील डोंगराळ भागात मेंढपाळ ज्ञानेश्वर तिरताप हे नेहमीप्रमाणे मेंढ्यांचा कळप चारत होते. दरम्यान, अचानक पावसासह वादळी वारे आणि विजांचा कडकडाट सुरू झाला. याचवेळी कळपाजवळ वीज कोसळल्याने ४० मेंढ्यांचा जागीच मृत्यू झाला. मृत झालेल्या मेंढ्या या जैताणे येथील धनराज जीपा तिरताप यांच्या मालकीच्या असल्याचे समोर आले आहे. एका क्षणात कळपातील ४० मेंढ्या दगावल्याने पशुपालकावर मोठे आर्थिक संकट ओढवले आहे.

जन सम्राट टाईम्स अँकर न्यूज

# जळगाव-छत्रपती संभाजीनगर सहापदरी महामार्गाचे सर्वेक्षण पूर्ण

## धरणगावातून होणार महामार्गाची सुरुवात; समृद्धी महामार्गाशी जोडणीमुळे खान्देशच्या विकासाला गती

**जन सम्राट टाईम्स**

**एरंडोल | प्रतिनिधी :** नागपूर-मुंबई समृद्धी महामार्गाला थेट जोडणाऱ्या प्रस्तावित जळगाव-छत्रपती संभाजीनगर सहापदरी शीघ्रसंचार द्रुतगती महामार्गाच्या उभारणीत महत्त्वाचा टप्पा पूर्ण झाला आहे. या महामार्गासाठीचे प्राथमिक सर्वेक्षण पूर्ण झाले असून अहवालही तयार करण्यात आला आहे. धरणगाव तालुक्यातील टाकळी परिसरातून या महामार्गाची सुरुवात होणार असल्याचे स्पष्ट झाले आहे. त्यामुळे लवकरच अधिसूचना जाहीर होऊन जमीन संपादन आणि निविदा प्रक्रियेला वेग येण्याची शक्यता व्यक्त होत आहे. राज्यातील महत्त्वाकांक्षी पायाभूत सुविधा प्रकल्पांपैकी एक असलेल्या या प्रवेश नियंत्रित सहापदरी द्रुतगती महामार्गाची एकूण लांबी सुमारे १०५ किलोमीटर असेल. धरणगाव तालुक्यातील टाकळी गावापासून सुरू होणारा हा महामार्ग पुढे छत्रपती संभाजीनगर जिल्ह्यात जाऊन नागपूर-मुंबई समृद्धी महामार्गाला जोडला जाणार आहे. या प्रकल्पामुळे खान्देश आणि मराठवाडा यांच्यातील संपर्क अधिक सुलभ होणार असून औद्योगिक, कृषी आणि व्यावसायिक विकासाला मोठी चालना मिळणार आहे. प्रवासाचा वेळ निम्म्यावर सध्या जळगावहून छत्रपती संभाजीनगर येथे जाण्यासाठी अजिंठा घाट किंवा करड घाट मार्गाचा वापर करावा लागतो. या प्रवासासाठी साधारण



दोन ते अडीच तास लागतात. मात्र, प्रस्तावित महामार्ग पूर्ण झाल्यानंतर हे अंतर अवघ्या एका तासात पार करता येणार आहे. तसेच समृद्धी महामार्गाशी थेट जोडणी झाल्याने जळगावहून मुंबई व नागपूरकडे जाणारा प्रवास अधिक जलद, सुरक्षित आणि सोयीस्कर होणार आहे. मुंबईपर्यंतचा प्रवास सुमारे चार तासांत पूर्ण करणे शक्य होईल. अनेक गावांना मिळणार विकासाची संधी प्रस्तावित महामार्ग धरणगाव, एरंडोल, जळगाव आणि पाचोरा तालुक्यातील अनेक गावांमधून जाणार आहे. धरणगाव तालुक्यातील टाकळी, पाळधी बुद्रुक व पाळधी खुर्द, एरंडोल तालुक्यातील सावदे प्र.चा., पिंपळकोठे प्र.चा., खेडी खुर्द, वंजरे खुर्द व वंजरे बुद्रुक या गावांचा समावेश आहे.जळगाव तालुक्यातील लांजन, कुन्हाड, वाकडी, म्हसावद, ओर, डोमगाव आणि पाथरी या गावांनाही या महामार्गाचा लाभ मिळणार आहे. तर पाचोरा तालुक्यातील सापनेर, लालगाव, आसनखेडे खुर्द, नांद्रा, पहाण, मोहाडी, नाईकनगर, सांगवी प्र., लोहारे, साजगाव, लोहारी बुद्रुक, वरखेडी बुद्रुक, लासुरे, वाणेगाव, राजुरी बुद्रुक, वाडी, शिंदाड आणि घाहाळे या गावांमधून महामार्गाचा मार्ग निश्चित करण्यात आला आहे.

### शेतकऱ्यांना मिळणार भरघोस मोबदला

या महामार्गामुळे पाचोरा तालुक्यासह अनेक भागांतील शेतजमिनी संपादित होणार आहेत. त्यामुळे संबंधित शेतकऱ्यांना जमिनीचा भरघोस मोबदला मिळण्याची अपेक्षा आहे. तसेच महामार्गालगत नवीन व्यवसाय, सेवा केंद्रे आणि बाजारपेठा विकसित होण्याची शक्यता असल्याने ग्रामीण अर्थव्यवस्थेला बळकटी मिळणार आहे. समृद्धी महामार्गाशी थेट जोडणी, कमी होणारा प्रवासाचा कालावधी, वाढणाऱ्या गुंतवणुकीच्या संधी आणि कृषी उत्पादनांना मिळणारी जलद बाजारपेठ यामुळे जळगाव-छत्रपती संभाजीनगर सहापदरी महामार्ग खान्देशच्या विकासासाठी 'गेमचेंजर' ठरणार असल्याची भावना नागरिक आणि व्यापारी वर्गातून व्यक्त होत आहे.

# ग्रामपंचायत आरक्षणातील कथित अन्यायाविरोधात बहुजन मुक्ती पार्टीचा एल्गार!

## शासन निर्णय मागे न घेतल्यास तीव्र आंदोलनाचा इशारा

जन सम्राट टाईम्स



**जळगाव । प्रतिनिधी:** आगामी ग्रामपंचायत निवडणुकांच्या पार्श्वभूमीवर आरक्षण निश्चिती प्रक्रियेत सामाजिक न्यायाच्या तत्त्वांना तिलांजली देण्यात आल्याचा आरोप करत बहुजन मुक्ती पार्टीने जळगाव जिल्हाधिकारी कार्यालयावर आंदोलन छेडले. महाराष्ट्र शासनाच्या २५ मे व २६ मे २०२६ रोजीच्या शासन निर्णयाविरोधात पक्षाच्या वतीने निवासी उपजिल्हाधिकारी वैशाली चव्हाण यांना निवेदन सादर करण्यात आले. जुलै महिन्यात राज्यातील सुमारे १४ हजार ग्रामपंचायतींच्या निवडणुका होत असून अनुसूचित जाती, अनुसूचित जमाती आणि इतर मागास प्रवर्गासाठी आरक्षित जागा निश्चित करताना संबंधित समाजाची लोकसंख्या, सामाजिक वास्तव आणि प्रभावी राजकीय प्रतिनिधित्व यांचा विचार करण्यात आलेला नसल्याचा आरोप आंदोलनकर्त्यांनी केला. ज्या वॉर्डांमध्ये संबंधित प्रवर्गाची लोकसंख्याच नाही, त्या ठिकाणी आरक्षण लागू करून लोकशाहीची थट्टा करण्यात आल्याचे बहुजन मुक्ती पार्टीचे म्हणणे आहे. पक्षाच्या मते, भारतीय राज्यघटनेच्या कलम २४३(डी) अंतर्गत अनुसूचित जाती,मागासवर्गीयांना स्थानिक स्वराज्य संस्थांमध्ये प्रभावी राजकीय प्रतिनिधित्व मिळावे यासाठी विशेष तरतुदी करण्यात आल्या आहेत. मात्र शासनाच्या नव्या निर्णयामुळे या घटनात्मक उद्देशालाच हरताळ फासण्याचा प्रयत्न होत असल्याचा आरोप करण्यात आला.यावेळी पक्षाच्या नेत्यांनी सर्वोच्च न्यायालयातील के. कृष्णमूर्ती विरुद्ध भारत सरकार तसेच विकास कृष्णराव गवळी विरुद्ध महाराष्ट्र शासन या प्रकरणांचा संदर्भ देत शासन निर्णय घटनात्मक तरतुदींना विरोधी असल्याचा दावा केला. तसेच भारतीय राज्यघटनेतील कलम १४, १५(४), १५(५), १७, ३८, ४६ आणि २४३(डी) यांच्या भावनेचे उल्लंघन होत असल्याचेही निवेदनात नमूद करण्यात आले. बहुजन मुक्ती पार्टीच्या राज्य समीक्षा प्रभारी सुमित्र अहिरे यांनी सांगितले की, शासनाने २५ मे व २६ मे २०२६ चा निर्णय तात्काळ रद्द करून पूर्वीप्रमाणे लोकसंख्येच्या आधारे आरक्षण निश्चित करावे. अन्यथा राज्यभर तीव्र स्वरूपाचे आंदोलन उभारण्यात येईल. हे आंदोलन बहुजन मुक्ती पार्टीचे जिल्हा युवा अध्यक्ष सुनील देहडे आणि तालुका अध्यक्ष रविंद्र मोरे यांच्या नेतृत्वाखाली पार पडले. यामध्ये विविध सामाजिक, राजकीय आणि ग्रामपंचायत प्रतिनिधींनी सहभाग घेतला. आंदोलनात माजी जिल्हा परिषद सदस्य विलास सोनवणे, सावरकर रिक्षा युनियनचे जिल्हाध्यक्ष दिलीप सपकाळे, बांभोरीचे सरपंच सचिन बिर्हाडे, उमाळे ग्रामपंचायतीचे उपसरपंच योगेश सोनवणे, राष्ट्रवादी काँग्रेस (शरद पवार गट) तालुकाध्यक्ष संजय जाधव यांच्यासह विविध संघटनांचे पदाधिकारी व कार्यकर्ते मोठ्या संख्येने उपस्थित होते.

### लोकसंख्येच्या आधारे आरक्षण निश्चित करावे

भारतीय राज्यघटनेतील कलम १४, १५(४), १५(५), १७, ३८, ४६ आणि २४३(डी) यांच्या भावनेचे उल्लंघन होत असल्याचेही निवेदनात नमूद करण्यात आले. बहुजन मुक्ती पार्टीच्या राज्य समीक्षा प्रभारी सुमित्र अहिरे यांनी सांगितले की, शासनाने २५ मे व २६ मे २०२६ चा निर्णय तात्काळ रद्द करून पूर्वीप्रमाणे लोकसंख्येच्या आधारे आरक्षण निश्चित करावे. हे आंदोलन बहुजन मुक्ती पार्टीचे जिल्हा युवा अध्यक्ष सुनील देहडे आणि तालुका अध्यक्ष रविंद्र मोरे यांच्या नेतृत्वाखाली पार पडले.

# भुसावळ तालुक्यात रेशन धान्य वितरणाचा बोजवारा!

जन सम्राट टाईम्स




**भुसावळ । प्रतिनिधी :** भुसावळ तालुक्यासह जळगाव जिल्ह्यातील रेशनकार्डधारकांसमोर अन्नधान्य वितरणाचा गंभीर प्रश्न निर्माण झाला असून, ई-पॉस यंत्रणेतील तांत्रिक अडचणींमुळे रेशन धान्य वाटप प्रक्रिया अक्षरशः ठप्प झाली आहे. केंद्र शासनाने मे आणि जून महिन्यांचे धान्य १५ जूनपर्यंत वितरित करण्याचे निर्देश दिले असले, तरी अनेक लाभार्थ्यांना अद्याप धान्य मिळाले नसल्याने संताप व्यक्त होत आहे. केंद्र सरकारने पावसाळ्याच्या पार्श्वभूमीवर एप्रिल, मे आणि जून या तीन महिन्यांचे धान्य एकाच वेळी उपलब्ध करून देण्याचा निर्णय घेतला होता. मात्र, मे महिन्यात झालेल्या हमालांच्या संपामुळे धान्य पुरवठा आणि वितरण व्यवस्थेवर मोठा परिणाम झाला. परिणामी धान्य दुकानदारांकडे पोहोचण्यात उशीर झाला आणि संपूर्ण प्रक्रिया विस्कळीत झाली. जून महिन्याच्या धान्य वाटपातही अडथळे मे महिन्याच्या धान्य वितरणासाठी शासनाने १५ जूनपर्यंत मुदतवाढ दिली होती. मात्र त्याच कालावधीत जून महिन्याच्या धान्य वाटपाचे आदेश आल्याने गोंधळ अधिक वाढला. तालुक्यातील सुमारे ३० ते ४० टक्के लाभार्थ्यांना जून महिन्याचे धान्य अद्याप मिळालेले नाही. रेशन दुकानदारांच्या ई-पॉस मशीनमध्ये जून महिन्याच्या धान्य वितरणाची नोंदच दिसत नसल्याने धान्य वाटप पूर्णपणे अडकले आहे. त्यामुळे लाभार्थी आणि दुकानदार दोघेही संभ्रमात सापडले आहेत. मुदतवाढीसाठी शासनाकडे मागणी परिस्थितीचे गांभीर्य लक्षात घेऊन जिल्हा पुरवठा विभागाने राज्य शासनाकडे धान्य वितरणासाठी मुदतवाढ देण्याची मागणी केली आहे. तसेच ऑल इंडिया फेअर प्राईस डीलर फेडरेशन आणि अखिल भारतीय राज्य स्वस्त धान्य दुकानदार महासंघ यांच्या वतीनेही केंद्र शासनाकडे जून महिन्याच्या धान्य वाटपाची मुदत ३० जूनपर्यंत वाढविण्याची विनंती करण्यात आली आहे. हजारो लाभार्थ्यांमध्ये चिंता धान्य वितरणातील या गोंधळामुळे हजारो रेशनकार्डधारकांना त्यांच्या हक्काच्या धान्यापासून वंचित राहण्याची भीती निर्माण झाली आहे.

जन सम्राट टाईम्स सत्याचे प्राईस ब्रेक न्यूज ज

# फरार आरोपीकडून कुटुंबीयांचे खासगी फोटो व्हायरल!

## अटकेसाठी शिंदे कुटुंबीयांची एसपींकडे धाव



जन सम्राट टाईम्स

**धुळे । प्रतिनिधी :** गुन्ह्यातील फरार आरोपीकडून कुटुंबीयांचे खासगी फोटो समाजमाध्यमांवर व्हायरल करून ब्लॅकमेलिंग व बदनामी केली जात असल्याचा गंभीर आरोप करत शिंदे कुटुंबीयांनी जिल्हा पोलीस अधीक्षकांकडे धाव घेतली आहे. फरार आरोपी निलेश राजू देवरे याला तात्काळ अटक करण्यात यावी, अशी मागणी सुमित शिंदे व त्यांच्या कुटुंबीयांनी निवेदनाद्वारे केली आहे. निवेदनात म्हटले आहे की, आरोपी निलेश देवरे हा फरार असतानाही समाजमाध्यमांचा वापर करून कुटुंबातील सदस्यांचे खासगी फोटो प्रसारित करत आहे. यामुळे कुटुंबाची बदनामी होत असून मानसिक त्रासालाही सामोरे जावे लागत आहे. तसेच आरोपीकडून ब्लॅकमेलिंगचे प्रकार सुरू असल्याचा आरोप करण्यात आला आहे. चोरलेल्या मोबाईलचा गैरवापर केल्याचा आरोप शिंदे कुटुंबीयांच्या म्हणण्यानुसार, चोरलेल्या मोबाईलचा वापर करून पत्नीच्या नावाने बनावट सोशल मीडिया खाते तयार करण्यात आले आहे. या खात्याचा गैरवापर होण्याची शक्यता असल्याने कुटुंबाच्या सुरक्षिततेचा प्रश्न निर्माण झाला आहे. आरोपीकडून भविष्यात आणखी गंभीर प्रकार घडू शकतात, अशी भीतीही त्यांनी व्यक्त केली आहे. आरोपीविरोधातील गुन्ह्यांची माहिती पोलीसांकडे यावेळी शिंदे कुटुंबीयांनी आरोपी निलेश देवरे याच्याविरोधात दाखल असलेल्या विविध गुन्ह्यांची यादीही जिल्हा पोलीस अधीक्षकांना सादर केली. आरोपीला तातडीने अटक करून कठोर कारवाई करावी, अशी मागणी त्यांनी केली. निवेदन स्वीकारल्यानंतर पोलीस प्रशासनाने प्रकरणाची दखल घेत आवश्यक कारवाई करण्याचे आश्वासन दिल्याची माहिती कुटुंबीयांनी दिली. यावेळी सुमित शिंदे, ज्योती सुभाष शिंदे, रेखा संजय शिंदे, मनीषा प्रदीप जाधव, योगेश सुनील सूर्यवंशी, हितेश देवेंद्र बरेलीकर, विशाल मनोज चव्हाण, विजय श्रीराम अहिरे, सोनू विधाते आदी उपस्थित होते.

### सुरक्षिततेचा प्रश्न

चोरलेल्या मोबाईलचा गैरवापर केल्याचा आरोप शिंदे कुटुंबीयांच्या म्हणण्यानुसार, चोरलेल्या मोबाईलचा वापर करून पत्नीच्या नावाने बनावट सोशल मीडिया खाते तयार करण्यात आले आहे. या खात्याचा गैरवापर होण्याची शक्यता असल्याने कुटुंबाच्या सुरक्षिततेचा प्रश्न निर्माण झाला आहे. भविष्यात आणखी गंभीर प्रकार घडू शकतात, अशी भीतीही त्यांनी व्यक्त केली आहे.

# पाळधीनजीक अपघातात तिघांचा जागीच मृत्यू!

जन सम्राट टाईम्स

**धरणगाव/पाळधी :** धरणगाव तालुक्यातील पाळधीनजीक सावदा-रिंगणगाव मार्गावर सोमवारी दुपारी झालेल्या भीषण अपघातात तीन जणांचा जागीच मृत्यू झाला, तर एक जण गंभीर जखमी झाला. दोन दुचाकींची समोरासमोर जोरदार धडक झाल्याने हा हृदयद्रावक अपघात घडला असून संपूर्ण परिसरात शोककळा पसरली आहे. मिळालेल्या माहितीनुसार, पथराड येथील रहिवासी किरण बाबूलाल राक्षे-मराठे (वय ३८) हे आपल्या वडिलांसोबत पद्मालय येथे आयोजित लग्नसमारंभ आटोपून दुचाकीने घरी परतत होते. दुपारी सुमारे दोन वाजण्याच्या सुमारास पाळधीनजीक त्यांच्या दुचाकीची समोरून येणाऱ्या दुसऱ्या दुचाकीशी समोरासमोर धडक झाली. धडक इतकी भीषण होती की दोन्ही दुचाकींचा अक्षरशः चक्काचूर झाला. या अपघातात किरण राक्षे यांच्यासह दुसऱ्या दुचाकीवरील चेतन भिकन पाटील (वय ३५, रा. वाडेगुडे, ता. भडगाव) आणि प्रदीप उखा निकम (वय ४०, रा. गोंदेगाव-निंभोरा, जि. छत्रपती संभाजीनगर) यांचा जागीच मृत्यू झाला. अपघाताच्या तीव्रतेमुळे तिघेही रस्त्यावर फेकले गेले आणि गंभीर दुखापतींमुळे त्यांचा घटनास्थळीच मृत्यू झाला. दरम्यान, किरण राक्षे यांचे वडील बाबूलाल राक्षे हे गंभीर जखमी झाले असून त्यांच्यावर उपचार सुरू आहेत. घटनेची माहिती मिळताच स्थानिक नागरिकांनी मदतीसाठी धाव घेतली. जखमी व मृतांना १०८ रुग्णवाहिकेच्या सहाय्याने जळगाव जिल्हा सामान्य रुग्णालयात हलविण्यात आले. मात्र वैद्यकीय अधिकाऱ्यांनी तपासणीनंतर तिघांना मृत घोषित केले. मृत चेतन पाटील आणि प्रदीप निकम हे जिवलग मित्र असल्याची माहिती समोर आली आहे. ते नातेवाईकांची भेट घेऊन परतत असताना काळाने त्यांच्यावर झडप घातली.

# धुळ्यात गुंगीकारक कफ सिरपचा मोठा साठा जप्त; 10.51 लाखांचा मुद्देमाल हस्तगत

## स्थानिक गुन्हे शाखेची धडक कारवाई; सुरतमधील तिघे आरोपी जेरबंद

जन सम्राट टाईम्स




**धुळे । प्रतिनिधी:** मानवी मेंदूवर विपरीत परिणाम करणाऱ्या गुंगीकारक औषधांच्या अवैध विक्रीविरोधात स्थानिक गुन्हे शाखेने मोठी कारवाई करत तब्बल १० लाख ५१ हजार २५० रुपयांचा मुद्देमाल जप्त केला आहे. या प्रकरणात सुरत येथील तिघा आरोपींना अटक करण्यात आली असून गुंगीकारक कफ सिरपच्या अवैध रॅकेटचा तपास सुरू करण्यात आला आहे. पोलीस अधीक्षक विशाल आनंद यांनी गुंगीकारक औषधांची बेकायदेशीर विक्री करणाऱ्यांवर कठोर कारवाई करण्याचे निर्देश दिल्यानंतर स्थानिक गुन्हे शाखेने ही धडक मोहीम राबवली. त्यानुसार पोलीस निरीक्षक ज्ञानेश्वर वारे यांना मिळालेल्या गोपनीय माहितीनुसार सुरतहून मालेगावकडे गुंगीकारक कफ सिरपचा साठा नेला जात असल्याची माहिती मिळाली होती. या माहितीच्या आधारे स्थानिक गुन्हे शाखेच्या पथकाने कुरकुंबा परिसरातील उण पुलाखाली सापळा रचला. संशयित इनोव्हा कार (GJ-16/BB-2607) दिसताच पोलिसांनी वाहन अडवून तपासणी केली. तपासणीदरम्यान वाहनातून मोठ्या प्रमाणात मानवी मेंदूवर परिणाम करणाऱ्या कफ सिरपच्या बाटल्या आढळून आल्या. याप्रकरणी वाहन चालक एजाज रफीक शेख (वय २५, रा. सलाबादपुरा, सुरत) याला ताब्यात घेण्यात आले. त्याच्या ताब्यातून ४१ हजार २५० रुपये किमतीच्या गुंगीकारक कफ सिरपच्या बाटल्या, १० लाख रुपये किमतीची इनोव्हा कार आणि १० हजार रुपये किमतीचा मोबाईल असा एकूण १० लाख ५१ हजार २५० रुपयांचा मुद्देमाल जप्त करण्यात आला. या प्रकरणी धुळे तालुका पोलीस ठाण्यात भारतीय न्याय संहिता (BNS) तसेच गुंगीकारक औषधी द्रव्य आणि मनोव्यापारावर परिणाम करणारे पदार्थ अधिनियम (NDPS Act) आणि औषधी द्रव्य व सौंदर्य प्रसाधन अधिनियमांतर्गत गुन्हा दाखल करण्यात आला आहे. त्यामागे कोणते मोठे रॅकेट कार्यरत आहे आणि या अवैध व्यवसायाचे मूळ सूत्रधार कोण आहेत, ही कारवाई पोलीस अधीक्षक विशाल आनंद, अपर पोलीस अधीक्षक अजय देवरे यांच्या मार्गदर्शनाखाली पोलीस निरीक्षक ज्ञानेश्वर वारे, पोलीस उपनिरीक्षक चेतन मुंठे तसेच स्थानिक गुन्हे शाखेच्या पथकाने यशस्वीरीत्या पार पाडली.

# नामदार गुलाबराव पाटील यांच्या वाढदिवसा निमित्त विद्यार्थ्यांना शालेय साहित्य वाटप!

जन सम्राट टाईम्स



**दोनगाव बु. । प्रतिनिधी :** राज्याचे मंत्री तथा लोकप्रिय नेते गुलाबराव पाटील यांच्या वाढदिवसानिमित्त जी.पी. मित्र परिवार, दोनगाव बु. यांच्या वतीने जिल्हा परिषद प्राथमिक शाळा, दोनगाव येथे विद्यार्थ्यांना वह्या व शालेय साहित्याचे वाटप करण्यात आले. या उपक्रमामुळे विद्यार्थ्यांमध्ये उत्साहाचे वातावरण निर्माण झाले. कार्यक्रमात माननीय माजी जिल्हा परिषद सदस्य प्रतापभाऊ यांच्या हस्ते विद्यार्थ्यांना वह्या व विविध शालेय साहित्याचे वितरण करण्यात आले. कार्यक्रमाच्या अध्यक्षस्थानी वासुदेव गणपत पाटील होते. यावेळी राष्ट्रवादी काँग्रेसचे नाटेश्वर पवार, वासुदेव पाटील सर, सुरेश पवार, संजय पवार सर, माजी पोलिस पाटील मच्छिंद्र आप्पा, शिवाजी रूपचंद पाटील, राजेंद्र लोटन पाटील, पुरुषोत्तम आप्पा, सुनील आबा, किशोर तात्या महाराज, भगवान वानखेडे, माजी उपसरपंच जितेंद्र कौतिक पाटील (लालू), मनोज सुरेश पाटील (आप्पा), भगवान आबा, भावलाल दादा, संदीप आसाराम पाटील, शालेय व्यवस्थापन समितीचे अध्यक्ष कांतीलाल खोंडे, योगेश मच्छिंद्र पाटील, कैलास अर्जुन पाटील, दीपक शांताराम पाटील, गुलाबराव सिताराम पाटील, समाधान युवराज पाटील (खंडा), नितीन अर्जुन पाटील (संभा), भगवान पाटील, रमाकांत पाटील आणि चंद्रभान पाटील यांच्यासह अनेक मान्यवर उपस्थित होते. कार्यक्रमास शाळेच्या मुख्याध्यापिका, शिक्षकवृंद, विद्यार्थी व विद्यार्थिनी मोठ्या संख्येने उपस्थित होते. विद्यार्थ्यांना शैक्षणिक साहित्य उपलब्ध करून देण्याच्या या उपक्रमाचे पालक आणि ग्रामस्थांनी स्वागत केले. यावेळी उपस्थित मान्यवरांनी विद्यार्थ्यांना नियमित शिक्षण घेऊन उज्ज्वल भविष्य घडविण्याचे आवाहन केले. सामाजिक बांधिलकी जपत विद्यार्थ्यांच्या शैक्षणिक गरजांना हातभार लावणारा हा उपक्रम प्रेरणादायी असल्याचे मत उपस्थितांनी व्यक्त केले.

# पोलीसांच्या प्रलंबित मागण्यांसाठी संविधान संरक्षण समिती आक्रमक

## मागण्यांसाठी पोलीस अधीक्षकांना निवेदन

जन सम्राट टाईम्स



**धुळे | प्रतिनिधी:** पोलीस अधिकारी व कर्मचाऱ्यांच्या विविध प्रलंबित मागण्यांकडे शासनाने तातडीने लक्ष द्यावे, या मागणीसाठी संविधान संरक्षण समितीच्या वतीने धुळे जिल्हा पोलीस अधीक्षकांना निवेदन सादर करण्यात आले. वेतनश्रेणी, कामाचे तास, रजा, विमा संरक्षण, गृहकर्ज, कल्याणकारी योजना तसेच संघटना स्थापनेच्या अधिकारासह अनेक महत्त्वाच्या मुद्द्यांचा या निवेदनात समावेश करण्यात आला आहे. समितीने सादर केलेल्या निवेदनात पोलीस दलातील अधिकारी व कर्मचाऱ्यांना आठव्या वेतन आयोगात महसूल विभागातील कर्मचाऱ्यांप्रमाणे वेतनश्रेणी लागू करावी, कामाचे तास आठ तासांपर्यंत मर्यादित करावेत आणि सार्वजनिक सुट्ट्या व अतिरिक्त रजांची सुविधा उपलब्ध करून द्यावी, अशी मागणी करण्यात आली आहे.

तसेच पोलीसांवरील अतिरिक्त कामांचा ताण कमी करण्यासाठी विविध विभागांची स्वतंत्र जबाबदारी निश्चित करण्याची मागणीही करण्यात आली. गृहकर्ज, विमा आणि भरती प्रक्रियेत सवलतीची मागणी पोलीस अधिकारी व कर्मचाऱ्यांना शून्य टक्के व्याजदराने गृहकर्ज उपलब्ध करून देणे, पोलिसांचे संख्याबळ वाढविण्यासाठी मोठ्या प्रमाणावर भरती करणे, पोलीस कर्मचाऱ्यांच्या मुलांना भरती प्रक्रियेत आरक्षण देणे तसेच कर्तव्यावर असताना मृत्यू झाल्यास अधिक विमा संरक्षण देण्याची मागणी निवेदनातून करण्यात आली आहे. यासोबतच पोलीस कल्याण निधी अधिक सक्षम करण्यावरही भर देण्यात आला. संघटना स्थापनेच्या अधिकारासाठीही मागणी पोलीस दलाला संघटना स्थापन करण्याची परवानगी देण्यात यावी, विधानसभेत पोलीस प्रतिनिधींना स्थान द्यावे तसेच पोलीसांच्या कामकाजात होणारा राजकीय हस्तक्षेप रोखण्यासाठी कठोर धोरण राबवावे, अशी मागणी संविधान संरक्षण समितीने केली आहे. पोलीसांच्या समस्या गांभीर्याने सोडविण्याची अपेक्षा निवेदनात नमूद करण्यात आले आहे की, पोलीस दल हे कायदा व सुव्यवस्था राखणारे महत्त्वाचे अंग असून अधिकारी व कर्मचारी दिवस-रात्र कर्तव्य बजावत असतात. मात्र अनियमित कामाचे तास, सततचा तणाव, कौटुंबिक आयुष्याकडे होणारे दुर्लक्ष, अपुरी विश्रांती आणि मर्यादित वेतन यामुळे अनेकांना शारीरिक व मानसिक समस्यांना सामोरे जावे लागत आहे. त्यामुळे शासनाने या प्रश्नांची गांभीर्याने दखल घेऊन तातडीने उपाययोजना कराव्यात, अशी मागणी करण्यात आली. यावेळी संविधान संरक्षण समितीचे हरिचंद्र लोंढे, जी. डी. जाधव, बी. बी. वानखेडे, गोपी लांडगे, मोहम्मद जैद, जमील मन्सुरी, पी. टी. बेडसे, एम. एच. मोहिते, कॉ. एल. आर. राव, श्रीकृष्ण बेडसे, महेंद्र पाटील, राजेंद्र अहिरे, दीपक सोनवणे यांच्यासह अनेक सामाजिक कार्यकर्ते उपस्थित होते.

जन सम्राट टाईम्स सत्याचे प्राईस अँकर न्यूज ज

# पोलिसांच्या तावडीतून 'विमल' तस्कर मामा फरार?; कारवाईवर संशयाची छाया

## गुटख्याने भरलेली कार जप्त, मात्र मुख्य आरोपी पसार; पोलिसांच्या भूमिकेवर प्रश्नचिन्ह

जन सम्राट टाईम्स



**शहादा सारंगखेडा : । प्रतिनिधी:** नंदुरबार जिल्ह्यातील शहादा तालुक्यातील सारंगखेडा परिसरात पोलिसांनी रात्रीच्या गस्ती दरम्यान प्रतिबंधित 'विमल' गुटख्याचा मोठा साठा जप्त केला. मात्र, कारवाईनंतर या प्रकरणातील मुख्य तस्कर पोलिसांच्या तावडीतून निसटल्याने संपूर्ण प्रकरणावर संशयाचे सावट निर्माण झाले असून नागरिकांमध्ये विविध चर्चांना उधाण आले आहे. मिळालेल्या माहितीनुसार, सारंगखेडा परिसरात पोलिसांचे पथक नियमित गस्त घालत असताना एका संशयास्पद कारमध्ये काही वस्तू भरल्या जात असल्याचे निदर्शनास आले. पोलिसांची चाहूल लागताच संबंधित वाहन चालकाने वाहन भरधाव वेगाने पळवून नेण्याचा प्रयत्न केला. यामुळे पोलिसांनी तत्काळ पाठलाग सुरू करत काही अंतरावर वाहन अडविले. वाहन थांबवल्यानंतर चालकाची चौकशी करण्यात आली. मात्र, त्याच्याकडून समाधानकारक माहिती मिळाली नाही. संशय बळावल्याने पोलिसांनी वाहनाची तपासणी केली असता कारमध्ये मोठ्या प्रमाणात प्रतिबंधित 'विमल' गुटखा आढळून आला. त्यानंतर पोलिसांनी वाहनासह गुटख्याचा साठा जप्त केला. मात्र, या कारवाईतील सर्वात धक्कादायक बाब म्हणजे गुटखा जप्त होऊनही मुख्य तस्कर अथवा वाहनाशी संबंधित प्रमुख व्यक्ती पोलिसांच्या हाती लागली नाही. त्यामुळे "गुटखा सापडला, पण मुख्य आरोपी पळून कसा गेला?" असा सवाल नागरिकांकडून उपस्थित केला जात आहे. स्थानिकांमध्ये या प्रकरणाबाबत उलटसुलट चर्चा सुरू असून काहींनी पोलिसांच्या निष्काळजीपणावर बोट ठेवले आहे. तर काहींनी या प्रकरणात संगनमताची शक्यता नाकारता येत नसल्याचे मत व्यक्त केले आहे. त्यामुळे संपूर्ण प्रकरणाची निष्पक्ष चौकशी करून फरार आरोपीचा तातडीने शोध घेण्याची मागणी जोर धरू लागली आहे. दरम्यान, पोलिसांनी संबंधित प्रकरणी गुन्हा दाखल करण्याची प्रक्रिया सुरू केली असून फरार संशयिताचा शोध सुरू असल्याचे सांगितले आहे. या कारवाईमागील नेमके सत्य काय आहे, आरोपी कोण आहे आणि तो पोलिसांच्या हातातून कसा निसटला, याबाबत अनेक प्रश्न अद्याप अनुत्तरित आहेत. या घटनेमुळे सारंगखेडा परिसरात खळबळ उडाली असून पुढील तपासातून नेमकी वस्तुस्थिती समोर येते का, याकडे नागरिकांचे लक्ष लागले आहे.

### मुख्य आरोपी पळून कसा गेला?"

संशय बळावल्याने पोलिसांनी वाहनाची तपासणी केली असता कारमध्ये मोठ्या प्रमाणात प्रतिबंधित 'विमल' गुटखा आढळून आला. कारवाईतील सर्वात धक्कादायक बाब म्हणजे गुटखा जप्त होऊनही मुख्य तस्कर अथवा वाहनाशी संबंधित प्रमुख व्यक्ती पोलिसांच्या हाती लागली नाही.

Printed, published and Owned by Mukundrao Shamrao Nannaware, and printed at Shri Samarth Krupa Digital Printers, Plot No. 16. S.R. No.39/1 Sadguru Nagar, MIDC Jalgaon-425001 and published at 2nd FLOOR, BALAJI SANKUL, NEAR KHAJAMIYA CHOUK, JALGAON (MS.) PIN - 425001, Editor - Mukundrao Shamrao Nannaware Title Code - T/MH/2026/0422/5204/1306